# मेट्रो ३ : विधानभवन ते चर्चगेटदरम्यानचे भुयार पूर्ण

**भुयाराचा १९ वा टप्पा पार**

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यानच्या विधानभवन ते चर्चगेट यादरम्यानच्या भुयाराचे काम गुरुवारी पूर्ण करण्यात आले. गुरुवारी दुपारी १२ च्या सुमारास सूर्या टीबीएमने मेट्रो ३ मार्गिकेदरम्यानच्या १९ वे भुयार खणण्यात यश आले आहे.

सूर्या १ टीबीएमने विधानभवन ते चर्चगेट स्थानकांदरम्यानचे ४९९ मीटर भुयारीकरणाचे काम तब्बल ९० दिवसांत पूर्ण केले असल्याचे एमएमएआरसीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तर सहा दिवसांपूर्वीच वैनगंगा १ या टीबीएमद्धारे पाली ग्राऊंड ते सीप्झ या भागातील १९८९ मीटर भुयारीकरणाचा टप्पा पार केला आहे. दक्षिण मुंबईकडील बोगदा पूर्ण करणारी मेट्रो ३ प्रकल्पातील वैतरणा १ ही पहिली टीबीएम ठरली असून मशीनने १८ वे भुयार खणले आहे. ५५ किमीपैकी ३२ किमी मार्गिकेचे काम पूर्ण झाले असून सध्या १७ टीबीएम कार्यरत आहेत. एकूण सात पॅकेजपैकी सिद्धिविनायक मंदिर ते धारावी हा सर्वात मोठा टप्पा असून यामध्ये ११.२ किमी भुयारापैकी ६.८९ किमी भुयाराचे काम आतापर्यंत पूर्ण करण्यात आले आहे.